नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १९१ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. १९ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# विनयभंग करणाऱ्या आरोपीच्या बेकायदा घरावर बुलडोझर

## अहिल्यानगरमधील पहिलीच कारवाई, माजी खासदार विखे यांनी शब्द पाळला

■ १४ वर्षांच्या पीडित मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपी हरिदास गायकवाडचे बेकायदेशीर बांधकाम उद्ध्वस्त

राहाता : (स. गांवकरी)

शहरातील अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याच्या आरोपावरून दाखल गुन्ह्यातील मुख्य आरोपीच्या बेकायदेशीर घरावर नगरपालिका व पोलीस प्रशासनाने बुलडोझर फिरवीत, अतिक्रमण केलेले बांधकाम उद्ध्वस्त केले. अशा प्रकारची ही जिल्ह्यातील पहिलीच कारवाई आहे. ही कारवाई आज, गुरूवारी करण्यात आली. यावेळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी आपला शब्द खरा करून



दाखवल्याने या धडक कारवाईची जोरदार चर्चा सुरू आहे. मतदारसंघातील महिला व मुलींची छेड काढली किंवा त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहिले, तर त्याच्या घरावर मी स्वतः जेसीबी चालवणार, असा इशारा काही दिवसांपूर्वी माजी खासदार विखे यांनी दिला होता. हा शब्द या कारवाईने त्यांनी खरा करून दाखविला. शहरातील एका १४ वर्षांच्या मुलीचा विनयभंग झाल्याची संतापजनक घटना समोर आली होती. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी तात्काळ दखल घेत आरोपी हरिदास गायकवाड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यास अटक केली.

पिडित मुलीला महिला पोलीस उपनिरीक्षकाने दमदाटी केल्याच्या निषेधार्थ मुलीच्या नातेवाईकांनी व शहरातील नागरिकांनी पोलीस ठाण्यावर मोर्चा आणून संबंधित महिला अधिकाऱ्याची बदली करावी व मुख्य आरोपीला सहकार्य करणाऱ्या इतर आरोपींवर कारवाई करावी अशी मागणी केली होती. त्यावेळी नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांनी आरोपी हरिदास गायकवाडचे घर पाडण्यासाठी नोटीस बजावल्याचे सांगितले होते.

काही दिवसांपूर्वी राहता येथील कार्यक्रमात माजी खासदार विखे यांनी शहरातील गुन्हेगारी आणि महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा आक्रमकपणे मांडला होता. साकुरी आणि राहाता शहरातील महिलांच्या सुरक्षेचा हवाला देत महिलांना व मुलींना त्रास देणाऱ्यांच्या घरावर जेसीबी चालवण्याचा इशारा त्यांनी गुन्हेगारांना दिला होता. त्यांनी हा इशारा कृतीत आणला.

राहता नगरपालिकेने नगराध्यक्ष, नगरसेवक, प्रशासकीय यंत्रणेच्या उपस्थितीत, पोलीस बंदोबस्तात आरोपीच्या बेकायदेशीर घरावर बुलडोझर फिरवला. अवघ्या काही वेळातच आरोपीचे घर उद्ध्वस्त करून विखे यांनी गुन्हेगारांना कडक संदेश यानिमित्ताने दिला आहे.

### गुन्हेगारांनी बोध घ्यावा

शिर्डी मतदारसंघातील महिला व मुलींची छेड काढणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध कारवाईचा इशारा माजी खासदार सुजय विखे यांनी दिला होता. त्यांच्या सूचनेप्रमाणे कारवाई करण्यात आली. पालिका प्रशासन, पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. आरोपी गायकवाड याचे पाच ते सहा ठिकाणी कच्चे व पक्के बांधकाम असलेली अतिक्रमणे होती. ती अतिक्रमणे बुलडोझरने उद्ध्वस्त केली. महिला व मुलींच्या विरोधात गैरकृत्य करणाऱ्या गुन्हेगारांनी यापुढे बोध घ्यावा.

**-डॉ. स्वाधीन गाडेकर, नगराध्यक्ष, राहाता नगरपरिषद.**

## थोडक्यात...

### विधान परिषदेसाठी ९९.७९ टक्के मतदान

परभणी (स. गांवकरी) : विधान परिषदेच्या परभणी – हिंगोली स्थानिक प्राधिकारी निवडणुकीसाठी गुरुवारी (दि. १८)सकाळी आठ ते दुपारी चार या वेळेत घेण्यात आलेल्या मतदान प्रक्रियेत सेलू तहसील मतदान केंद्रातील एका पुरुष मतदाराचा अपवाद वगळता उर्वरित सर्व सहा मतदान केंद्रांवर शंभर टक्के मतदान झाले आहे. महायुतीचे उमेदवार सईद खान, महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. विवेक नावंदर, अपक्ष उमेदवार सुशीलकुमार देशमुख यांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. या निवडणुकीसाठी परभणी – हिंगोली जिल्ह्यात मिळून ४६६ मतदार होते. त्यामध्ये २१२ पुरुष तर २५४ महिला मतदारांचा समावेश होता. मतदान करण्याच्या अंतिम वेळेपर्यंत दुपारी चार वाजेपर्यंत परभणी तहसील केंद्रातील सर्व १२८ गंगाखेड तहसील मतदान केंद्रातील सर्व ७३, पाथरी तहसील मतदान केंद्रातील सर्व ७४, हिंगोली तहसील मतदान केंद्रातील सर्व ५८, कळमनुरी तहसील मतदान केंद्रातील सर्व २३ आणि वसमत तहसील मतदान केंद्रातील सर्व ५१ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

### नगरसेवकही फुटणार

मुंबई (स. गांवकरी) : उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत पुन्हा एकदा फूट पडणार असल्याची चर्चा आहे. शनिवारी (१३ जून) मात्रोश्रीवर आयोजित केलेल्या बैठकीला पाच खासदारांनी दांडी मारल्यानंतर या चर्चेला आणखी बळ मिळाले. शिवसेनेच्या (ठाकरे) नऊ खासदारांपैकी सहा खासदार हे वेगळा गट करून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर आता शिंदेंच्या शिवसेनेतून प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. आमदार प्रकाश सुर्वे यांनी म्हटले की, खासदारांनंतर आमदार आणि नगरसेवकही ठाकरेंची साथ सोडतील. माध्यमांशी बोलताना प्रकाश सुर्वे म्हणाले, “ये तो बस झाँकी है, पुरा पिक्चर बाकी है. एकनाथ शिंदे नेहमी म्हणतात की, मला तुम्ही हलक्यात घेऊ नका. शिंदेंना हलक्यात घेतल्यामुळे काय होते, हे आता दिसत आहे.” ठाकरे गटाचे काही नगरसेवक आणि आमदारही फुटणार असल्याचे बोलले जात आहे, यावर प्रश्न विचारला असता प्रकाश सुर्वे यांनी आगामी काळात हे चित्र स्पष्ट होईल, असे सूचक विधान केले.

### ९९.८९ टक्के मतदान

सांगली (स. गांवकरी) : सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था गटातील विधान परिषदेच्या एका जागेसाठी गुरूवारी १२ मतदान केंद्रावर ९९.८९ टक्के मतदान झाले. मतदान अत्यंत शांततेने पार पडले असून सातारा अध्यक्ष निवडीवेळी झालेल्या गोंधळामुळे यावेळी मतदान केंद्रावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

# स्पर्धा परीक्षार्थ्यांसाठी मोठी बातमी, राज्यसेवेच्या पदसंख्येत वाढ !

पुणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित (गट अ, गट ब) संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ या परीक्षेच्या पदसंख्येमध्ये वाढ झाली आहे. पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर काही पदांची मागणीपत्रे आल्याने त्या पदांचा समावेश करण्यात आला असून, आता एकूण २६५ पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. एमपीएससीने सुधारित पदांचा तपशील संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. एमपीएससीने महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित (गट अ, गट ब) संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ या परीक्षेसाठी विविध संवर्गातील ८६ रिक्त पदांसाठीची जाहिरात प्रसिद्ध केली होती. जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर मृदा आणि जलसंधारण, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, पशुवैद्यकीय सेवा अशा काही विभागांनी त्यांची मागणीपत्र एमपीएससीकडे पाठवली. त्यामुळे एकूण पदसंख्येमध्ये वाढ झाली आहे. राज्यसेवेमध्ये एकूण एकूण २३८ पदांचा समावेश आहे. त्यात पोलिस उपअधीक्षक, सहायक पोलिस आयुक्त पदाच्या ८ जागा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी पदाच्या १३ जागा, वित्त आणि लेखा सेवेतील सहायक संचालक पदाच्या ३२ जागा, राज्य कर सहायक आयुक्त पदाच्या २३ जागा, मुख्य अधिकारी, सहायक आयुक्त पदाच्या ६ जागा, राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधीक्षक पदाच्या ७ जागा, सहायक गटविकास अधिकारी पदाच्या ३० जागा, उद्योग अधिकारी पदाच्या ४ जागा, मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी पदाच्या १० जागांचा समावेश आहे.

# शेतकऱ्यांना घरबसल्या मिळणार कृषी केंद्रांतील खतसाठ्यांची माहिती

## कृषी विभागाकडून ‘ब्लॉगस्पॉट’ ऑनलाईन प्रणाली विकसित

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

खत वितरणात पारदर्शकता निर्माण व्हावी तसेच शेतकऱ्यांना घरबसल्या आपल्या परिसरातल्या कृषी सेवा केंद्रात कोणत्या प्रकारच्या खताचा किती साठा शिल्लक आहे, याची माहिती आता सहज उपलब्ध होणार आहे. त्यासाठी कृषी विभागाने ‘ब्लॉगस्पॉट’ नावाची ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. जिल्ह्यात या प्रणालीचा वापर सुरू करण्यात आला आहे.

हंगामाच्या सुरुवातीला शेतकऱ्यांची कृषी निविष्ठांच्या खरेदीसाठी धांदल उडालेली असते. काही व्यापाऱ्यांकडून त्याचा गैरफायदा घेत साठा शिल्लक असूनही खते उपलब्ध नाहीत, असे सांगितले जाते, लिंकिंग पद्धतीने विक्री केली जाते, अधिक दराने विक्री केली जाते. त्यातून




शेतकऱ्यांची अडवणूक होते. शेतकऱ्यांची अडवणूक थांबण्यासाठी व खत वितरण व्यवस्थेत पारदर्शकता निर्माण करण्यासाठी ‘ब्लॉगस्पॉट’ नावाची ऑनलाईन प्रणाली कृषी विभागाने तयार केली आहे. ‘क्यूआर कोड’ पद्धतीने स्कॅन करून किंवा लिंकद्वारे याचा वापर करता येतो.‘क्यूआर कोड’ स्कॅन केल्यानंतर किंवा ‘लिंक ओपन’ केल्यानंतर जिल्हा, तालुका व कृषी सेवा केंद्रांची यादी दिसते. या केंद्रातून कोणता व किती खातसाठा शिल्लक आहे, याचीही माहिती असते. खताची विक्री ‘पॉज’ यंत्राद्वारे केली जाते. त्यामुळे अद्ययावत साठा नोंदवलेला असतो. ‘ब्लॉगस्पॉट’द्वारे माहिती घेऊन शेतकऱ्यांना आपल्याला हवे ते खत जवळच्या दुकानातून घेणे शक्य होत आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व परवानाधारक म्हणजे ५ हजारांवर कृषी सेवा केंद्रांची नावे या प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. कृषी विभागाकडून आता या ऑनलाइन प्रणालीचा प्रचार व प्रसार सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यात गेल्यावर्षी जून २०२५ मध्ये १३६७६ मेट्रिक टन युरिया साठा उपलब्ध झाला होता. आता जून २०१६ मध्ये १४२६७ मेट्रिक टन साठा उपलब्ध आहे. गेल्यावर्षीपेक्षा अधिक युरिया यंदा उपलब्ध आहे. पावसाअभावी पेरण्या खोळंबल्या आहेत. कृषी विभागानेही पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करण्याचे आवाहन केले आहे. असे असले तरी जेथे पाणी उपलब्ध आहे, अशा ठिकाणी शेतकऱ्यांनी पेरण्या सुरू केल्या आहेत.

मागील वर्षीच्या तुलनेत यंदा खरीप हंगामाचे नियोजन व्यवस्थित केल्याने पर्याप्त प्रमाणात युरिया व मागणी असणाऱ्या रासायनिक खतांचा साठा उपलब्ध आहे. वितरणात पारदर्शकता असावी यासाठी मोबाईलद्वारे ‘क्यूआर कोड’ स्कॅन करून शेतकऱ्यांना आपल्याला हवे ते खत कोणत्या कृषी सेवा केंद्रात उपलब्ध होईल याची माहिती घरबसल्या मिळू शकेल. या संदर्भात काही अडचणी असल्यास कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा. - **सुधाकर बोराळे, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, अहिल्यानगर.**

# संजय जाधवही ठरले फुटीरांच्या परंपरेचे पाईक

परभणी : (स. गांवकरी)

जो खासदार निवडून येतो तो पक्षद्रोह करतो ही या लोकसभा मतदारसंघाची परंपरा आहे. या कृतीला शिवसैनिक ‘गद्दारी’ असे संबोधतात. विद्यमान खासदार संजय जाधव यांनी पक्षाशी एकनिष्ठ राहून ही परंपरा मोडीत काढली होती. शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जाणाऱ्या या मतदारसंघाच्या फितुरीच्या इतिहासाला छेद देत त्यांनी परभणी लोकसभा मतदारसंघातून तीन वेळा खासदारकी मिळवली. मात्र त्यांनी तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर उबाठा शिवसेनेशी पक्षद्रोह केला. शिवसेनेकडून निवडून आल्यानंतर पक्षद्रोह करणाऱ्यांमध्ये अशोक देशमुख, सुरेश जाधव, तुकाराम रेंगे, गणेश दुधगावकर या माजी खासदारांमध्ये आता संजय जाधव यांचाही समावेश झाला



आहे. त्या अर्थाने जाधव हे फुटीरांच्या परंपरेचे पाईक ठरले आहेत. मराठवाड्यात शिवसेनेची लाट नव्वदीच्या दशकात आल्यानंतर अनेक ठिकाणी काँग्रेसचे परंपरागत बुरूज ढासळले. त्यात परभणीचाही समावेश होतो. १९८९ च्या निवडणुकीत प्रा. अशोक देशमुख यांना शिवसेनेने उमेदवारी दिली होती. काँग्रेसच्या रामराव लोणीकर यांचा पराभव करून ते ६५ हजारांच्या मताधिक्याने निवडून आले. लोकसभेची मुदतपूर्व निवडणूक १९९१ मध्ये झाली. त्यात देशमुख शिवसेनेच्या अधिकृत चिन्हावर निवडून आले. पुढे केंद्रातले काँग्रेसचे नरसिंह राव यांचे सरकार वाचविण्यासाठी त्यांनी पक्षाशी द्रोह केला. त्यांना १९९६ च्या निवडणुकीत काँग्रेसची उमेदवारीही मिळाली. त्यावेळी त्यांच्याविरुद्ध कोणतीच राजकीय ओळख नसणाऱ्या सुरेश जाधव यांना शिवसेनेने उमेदवारी दिली होती. त्यावेळी राजकारणात नवख्या असलेल्या जाधव यांनी अशोक देशमुख यांचा दारुण पराभव केला. तब्बल एक लाखांचे मताधिक्य त्यांनी मिळवले होते. लोकसभेच्या १९९८ च्या मुदतपूर्व निवडणुकीत काँग्रेसने सुरेश वरपूडकर यांना उमेदवारी दिली. तेव्हा राष्ट्रवादीची स्थापना झाली नव्हती. एकसंध काँग्रेसचे उमेदवार असलेल्या वरपुडकरांनी शिवसेनेच्या जाधव यांचा सरळ लढतीत ४६ हजार मतांनी पराभव केला.

# अमित शहांच्या आश्वासनानंतरही साखर उद्योगाला दिलासा नाहीच

मुंबई : (स. गांवकरी)

कांदा आणि साखर उद्योगाच्या प्रश्नांबाबत २७ मे रोजी दिल्लीत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करून दहा दिवसांत निर्णय घेऊ, असे आश्वासन शहा यांनी दिले होते. बैठक सकारात्मक झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सांगितले होते. प्रत्यक्षात २३ दिवसांनंतरही या बाबत कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांसह साखर उद्योगातून नाराजी व्यक्त होत आहे.


राज्यात कांद्याचे दर प्रति किलो दहा रुपयांच्याही खाली गेले होते. कांदा मातीमोल झाला होता. दुसरीकडे साखर उद्योगाच्या विविध प्रश्नांबाबत दिल्लीत शहा यांच्या अध्यक्षतेखाली आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, अन्न नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या



उपस्थितीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शिष्टमंडळाची बैठक झाली होती. राज्यातील साखर उद्योग मोठ्या आर्थिक अडचणीत आला आहे. गत सात वर्षापासून ३१ रुपये प्रति किलो असलेला साखरेचा किमान विक्री दर ४३ रुपये प्रति किलो करावा. बी हेवी मळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा खरेदी दर ६७ रुपये प्रति लिटर आणि ऊसाच्या रसापासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा खरेदी दर ७२ रुपये प्रति लिटर करावा. इथेनॉल खरेदीत साखर उद्योगाचा वाटा ९० टक्क्यांवरून २८ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे इथेनॉल खरेदी धान्य आणि साखर क्षेत्रातून सम समान व्हावी. बी हेवी मळीचे साठे पडून आहेत, त्यापासून इथेनॉल निर्मितीला परवानगी द्यावी. साखर कारखान्यांच्या कर्जाची फेररचना करावी, आदी प्रमुख मागण्या करण्यात आल्या होत्या. पण, या मागण्यांवर अद्याप कोणताही निर्णय घेतला गेला नाही. साखर उद्योग आर्थिक अडचणीत आहे, त्यामुळे तातडीने निर्णय घेण्याची गरज होती. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी दहा दिवसांत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते, आता २० दिवस उलटले तरीही कोणताही निर्णय झालेला नाही. केंद्र सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण करून साखर उद्योगाला दिलासा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील यांनी केली.

### दहा लाख टन कांदा खरेदी होणार ?

कांदा दरात मोठी घसरण झाल्यानंतर यंदाच्या खरेदी हंगामात नाफेड, एनसीसीएफने दोन लाख टनांच्या ऐवजी दहा लाख टन कांदा खरेदी करण्याची मुख्य मागणी राज्य सरकारच्या वतीने करण्यात आली होती. त्यासह कांदा खरेदी थेट बाजार समित्यांमधून व्हावी. कांद्याच्या प्रतवारीची सोय बाजार समितीत उपलब्ध करून द्यावी. कांदा बियाणांच्या निर्यातीवर कर लावावा. कांदा खरेदी दरात वाढ करावी. दरातील पडझड रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करावी आदी मागण्या करण्यात आल्या होत्या. प्रत्यक्षात बैठकीनंतर या बाबत कोणताही सकारात्मक निर्णय झालेला नाही.



# थोडक्यात पण महत्वाचे

## स्व. लक्ष्मीबाई नारायण आडेप यांचे प्रथम पुण्यस्मरण १९ जून रोजी!



संगमनेर (स. गांवकरी) : आई म्हणजे प्रेम, त्याग आणि ममतेचा अथांग सागर असतो. अशा मातृत्वाच्या स्मृती जपण्यासाठी आडेप परिवाराच्या वतीने परमपूज्य मातोश्री स्व. गं. भा. लक्ष्मीबाई नारायण आडेप यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम शुक्रवार, दि. १९ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम संगमनेर येथील मार्कंडेय मंदिरम्, रंगार गल्ली येथे सकाळी १२ वाजता होणार असून, यानिमित्त श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात येणार आहे. कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आडेप परिवाराने केले आहे. या पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन शांताराम नारायण आडेप, काशिनाथ नारायण आडेप, सतीश नारायण आडेप, सुधाकर नारायण आडेप तसेच समस्त आडेप परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी महाप्रसाद व भोजनाची व्यवस्था करण्यात आली असून भोजनाची वेळ सकाळी १२ ते २ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. स्व. लक्ष्मीबाई नारायण आडेप यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार असून, त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

## बेपत्ता महिला व तीन मुले सुखरूप

खोडद (स. गांवकरी) : ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तीन लहान मुलांसह बेपत्ता झालेल्या आदिवासी महिलेचा शोध घेण्यात ओतूर पोलिसांना अवघ्या दोन दिवसांत यश आले आहे. महिला आणि तिची तीनही मुले सुखरूप मिळाल्याने कुटुंबीयांनी तसेच पोलिसांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. पोलिसांनी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून महिला व मुलांना त्यांच्या पती आणि नातेवाईकांच्या स्वाधीन केले. पोलिसांच्या तत्परतेमुळे महिला आणि तिची मुले सुखरूप मिळाल्याने परिसरातून ओतूर पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कांता राजकिरण केदार वय ३३वर्षे, रा. टोकाकडे, ता. मुरबाड, जि. ठाणे या आपल्या तीन मुलांसह सासरच्या गावी बस्ती सावरगाव ता. जुन्नर येथे जाण्यासाठी निघाल्या होत्या. माहेरच्या नातेवाईकांनी त्यांना बसमध्ये बसवून दिले होते. त्या बनकर फाटा येथे उतरल्या. दरम्यान, त्यांचे पती त्यांना घेण्यासाठी सायंकाळी बनकर फाटा येथे आले होते. मात्र, महिलेकडे मोबाईल फोन नसल्याने दोघांची भेट होऊ शकली नाही. बराच वेळ प्रतीक्षा करूनही संपर्क न झाल्याने संबंधित महिलेने पुन्हा कल्याणकडे जाणारी बस पकडली आणि मुरबाड तालुक्यातील टोकावडे येथील आपल्या मामाच्या गावी निघून गेल्या. त्या सासरी न पोहोचल्याने कुटुंबीयांनी चिंतेतून १२ जून २०२६ रोजी ओतूर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती.

## झाडावर पिकलेल्या केशर आंब्याची चवच न्यारी



खोडद (स. गांवकरी) : रमेश खरमाळे यांनी त्यांचे जिवलग मित्र डॉ. अमोल पुंडे यांच्या घरी आज भेट दिली. त्यांच्या शेतातील आंब्याच्या बागेत झाडालाच पिशवी बांधून नैसर्गिकरीत्या पिकवलेला केशर आंबा आज प्रत्यक्ष बागेत जाऊन पाहण्याचा आणि त्याची अप्रतिम चव अनुभवण्याचा योग त्यांना आला. परतीच्या वेळी त्यांनी प्रेमाने भरलेली आंब्याची एक पेटी वानवळा म्हणून दिली ,त्यामुळे त्यांचा हा दिवस आणखी संस्मरणीय ठरला. झाडावरच पूर्णपणे पिकल्यामुळे या केशर आंब्याचा पिवळा धमक रंग , मोहक सुगंध, गोड चव आणि पौष्टिक गुणधर्म मनाला भुरळ घालणारे होते. निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला हा आंबा जसा स्वादिष्ट आहे, तसाच मित्रत्वाच्या नात्यातील आपुलकी आणि जिव्हाळाही अधिक गोड करणारा आहे. हा अविस्मरणीय अनुभव आणि मित्रांनी दिलेले प्रेम सदैव स्मरणात राहील, असे ते म्हणाले.

## पाटविहीरचा भूमिपुत्र राहुल गावित भारतीय सैन्यदलात

कनाशी (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील पाटविहीर गावचे भूमिपुत्र राहुल कांतीलाल गावित यांची इंडियन आर्मीमध्ये एन.सी.सी.मधून चांगल्या गुणांनी निवड झाली आहे. या यशाबद्दल ग्रामपंचायत आणि जि.प. शाळेच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. राहुलने मिळवलेल्या यशाबद्दल परिसरातील नागरिकांनी त्याचे विशेष कौतुक केले. "खेड्यातून आलेल्या तरुणाने देशसेवेसाठी सैन्यदलाची वाट निवडली, ही संपूर्ण गावासाठी अभिमानाची बाब आहे," असे राहुलचे सैन्य दलात भरती होणे ही नुसती गावापूर्ती नाही तर देशासाठी अभिमानाची बाब आहे असे यावेळी डी टी भोये यांनी आपल्या मनोगतातून सांगितले. राहुल गावितच्या या निवडीमुळे पाटविहीर गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्याच्यापासून इतर युवकांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन सरपंच व ग्रामस्थांनी केले.

## नगरमध्ये दिल्लीगेटच्या एस एस मोबाईलची फिल्मी स्टाईल फसवणूक

- बँकेचा बनावट शिक्का वापरून रक्कम ₹4,17,100 चा अपहार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : येथील एस एस मोबाईल , दिल्लीगेट शाखा, अहिल्यानगर या दुकानात काम करणारा सेल्स प्रमोटर मिलिंद मोरे(उर्फ अंकित मोरे)याने विश्वासघात करून आर्थिक फसवणूक केली आहे.अशी तक्रार अर्ज सदर दुकानाचे मालक प्रमोद गुंडू यांनी पोलीस अधीक्षक व तोफखाना पोलीस स्टेशनला दिला आहे. यामध्ये एस एस मोबाईलची फिल्मी स्टाईल फसवणूक व बँकेचा बनावट शिक्का वापरून रक्कम ₹4,17,100 चा अपहार केल्याबाबत तक्रार करून गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रार अर्जात म्हटले आहे कि आमच्या एस एस मोबाईल , दिल्लीगेट शाखा, अहिल्यानगर या दुकानात काम करणारा सेल्स प्रमोटर मोरे याने आमच्यासोबत विश्वासघात करून आर्थिक फसवणूक केली आहे. सदर दुकानाचे मालक प्रमोद गुंडू आहेत. सदर व्यक्ती मिलिंद मोरे याला आम्ही कंपनीकडे जमा करण्यासाठी वेगवेगळ्या दिवशी रोख रक्कम दिली होती.त्याने प्रत्येक वेळी बँकेत पैसे जमा केल्याचे सांगून बँकेच्या शिक्क्यासह जमा रक्कम ची पावती(Paid Slip)आम्हाला दिली.मात्र नंतर आमच्या कंपनीकडून चौकशी करण्यात आली असता त्यांनी सांगितले की संबंधित रक्कम त्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. त्यानंतर आम्ही बँकेत जाऊन चौकशी केली असता असे निदर्शनास आले की, संबंधित व्यक्तीने वापरलेला बँकेचा शिक्का बनावट (Fake Stamp) होता व प्रत्यक्षात कोणतीही रक्कम बँकेत जमा केलेली नव्हती.अशा प्रकारे त्याने आमचा विश्वास संपादन करून फसवणूक केली व पैसे अपहार केले.आम्ही त्याला खालीलप्रमाणे वेगवेगळ्या तारखांना रोख रक्कम दिली होती 21-02-2026 – ₹3,200, 23-02-2026 – ₹18,500, 24-02-2026 – ₹25,300, 26-02-2026 – ₹3,900, 02-03-2026 – ₹7,500,04-03-2026 – ₹8,700.तसेच मला एसएस मोबाईलच्या थकीत रकमेपैकी ३,५०,००० रुपये भरायचे होते.

# समाजाच्या न्यायासाठी संघर्ष करणार – डॉ. स्वामी शिरकुल वैदू







### वैदू समाजाला स्वतंत्र महामंडळ द्या

संगमनेर : (स. गांवकरी)

वैदू समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारमधील मंत्र्यांकडे पाठपुरावा करून समाजाला एकत्रित करण्याचे काम करणार असून, वैदू समाजाला स्वतंत्र महामंडळ देण्याची मागणी शासनाकडे करणार असल्याचे प्रतिपादन अखिल महाराष्ट्र वैदू समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. स्वामी शिरकुल वैदू यांनी केले.

संगमनेर येथे त्यांच्या प्रदेशाध्यक्षपदी निवडीबद्दल आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. स्वामी शिरकुल वैदू म्हणाले की, समाजाची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले आहे. अनेक वर्षांपासून समाजासाठी काम करत असताना विविध आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात कामे होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे आता वैदू समाजाच्या हक्कांसाठी संघटित लढा उभारला



जाणार आहे. समाजासाठी जे काही करता येईल ते प्रामाणिकपणे करणार असून, कोणत्याही वैयक्तिक अपेक्षा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात महिलांनी पारंपरिक औक्षण करून डॉ. शिरकुल वैदू यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी समाजातील युवकांना संघटनेच्या माध्यमातून संधी देण्याचे आश्वासन दिले. समाजातील होतकरू तरुणांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना सामाजिक कार्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल, असेही त्यांनी सांगितले. महालक्ष्मी वरखेड येथील वैदुवाडीतील देवी मंदिराच्या विकासासाठी भविष्यात आवश्यक ते योगदान देण्यास आपण बांधील असल्याचेही त्यांनी नमूद केले. या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक दर्शनासाठी येत असल्याने मंदिर परिसराच्या विकासासाठी सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी समाजाच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन डॉ. स्वामी शिरकुल वैदू यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात रामनाथ धनगर यांनी संघटना ही केवळ पदे मिरविण्यासाठी नसून समाजाच्या सुख-दुःखात उभी राहण्यासाठी असल्याचे सांगितले. तसेच समाजासाठी कार्य करणाऱ्या तरुणांना संघटनेत संधी देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात महालक्ष्मी वरखेड देवीच्या पुजारी श्रीमती सोन्याबाई गायकवाड यांनी देवीची महती सांगितली. यावेळी युवा नेते अनिल पवार, बबन गायकवाड, अण्णा शिंदे, मारुती गायकवाड, सापा शिंदे, शुभम शिंदे, अशोक शिंदे, रामा गायकवाड, अंबु गायकवाड, सुरेश गायकवाड, लखन शिंदे, दत्तू गायकवाड, लक्ष्मण शिंदे, दशरथ गायकवाड, राहुल शिंदे, सुहास मोरे आदींसह समाजातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आळेफाटा येथे भारतीय जनता पक्षाची बैठक संपन्न

खोडद : (स. गांवकरी)

भारतीय जनता पक्ष जुन्नर पूर्व मंडलाची मानसिक आढावा बैठक आळेफाटा येथे उत्साहात संपन्न झाली. पक्ष संघटना अधिक सक्षम आणि प्रभावी करण्याच्या दृष्टीने बुथ सक्षमीकरण, आगामी संघटनात्मक कार्यक्रमांचे नियोजन ,विविध आघाड्यांच्या कार्याचा आढावा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा अधिकाधिक नागरिकांपर्यंत प्रसार करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांच्या सहभागातून संघटन बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करत आगामी काळात अधिक जोमाने जनसंपर्क आणि जनसेवा उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला. मजबूत संघटन, सक्षम बुथ आणि जनतेचा विश्वास हेच भारतीय जनता पक्षाच्या यशाचे खरे बळ आहे. यावेळी भारतीय



जनता पार्टीचे मंडलाध्यक्ष अमोलभाऊ शिंदे, भाजपा मा .जिल्हाउपाध्यक्ष भगवानशेठ घोलप, शहराध्यक्ष विनोदशेठ शेळके ,महिला आघाडीच्या वैशालीताई देवकर, युवा मोर्चाचे जिल्हा पदाधिकारी अजितभाऊ घाडगे, युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष कुणालभाऊ पाटील, सोशल मीडियाचे प्रमुख वैभवजी डावखर, सिद्धार्थ गोपने व प्रमुख सर्व ज्येष्ठ पदाधिकारी युवा सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिलोली कृषि विभागाचा चौकशी अहवाल गुलदस्त्यात

बिलोली : (स. गांवकरी)

बिलोली तालुक्यात ऐन पेरणीच्या तोंडावर शहरातील कृषी सेवा केंद्र चालकांकडून बी-बियाणे आणि विविध प्रकारच्या खतांचा तुटवडा निर्माण करून तेलंगणात काळाबाजार केल्या जात असल्याची प्रशासनाकडे तक्रारी दाखल झाल्या ,याबाबत कृषि विभागाकडून चौकशीही करण्यात आली परंतु आर्थिक तडजोडी अंती चौकशी अहवाल गुलदस्त्यात ठेऊन त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. यामुळे खत माफियांचे मनोबल उंचावले असून पुन्हा तालुक्यात खताचा काळाबाजार होत असल्याचा प्रकार समोर येत आहे. बिलोली तालुका कृषि विभागाच्या भ्रष्ट प्रणालीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना बी-बियाणे व खाताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण होत



आहे, शहरातील काही नाफेखोर कृषि सेवा केंद्र चालकाकडून आपल्या नफेसाठी शेतकऱ्यांना खताची टंचाई दाखवून तालुक्यातील शेतकऱ्यासाठी आलेल्या खतसाठ्याचा सरळ तेलंगणात काळाबाजार करून मोठा नफा मिळवित असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे , याबाबत अनेक शेतकऱ्याकडून तक्रारीही दाखल करण्यात आल्या. परंतु तालुका कृषि विभागाकडून यावर आळा बसेल असे शेतकऱ्यांना वाटत होते, परंतु कृषि विभागच त्या नफेखोर खतमाफियांच्या पाठीशी असल्याचे दिसून येते.काही दिवसापूर्वी कृषि विभागाने तक्रारीच्या अनुषंगाने शहरातील कृषि सेवा केंद्राची चौकशी करण्यात आली होती पण या चौकशीत मोठी आर्थिक तडजोड झाल्याने त्या दोषी कृषि सेवा केंद्र चालकावर अद्याप कारवाई करण्यात आली नाही. म्हणून या कृषि विभागाच्या भ्रष्ट प्रणालीमुळे खत माफियांचे मनोबल उंचावले असून पुन्हा बिलोली शहरातून ऑटोरिक्षाच्या माध्यमातून कुंडलवाडी, नागणी मार्गाने तेलंगणात खत,बियाण्याची वाहतूक केली जात आहे. शहरातील सर्व कृषि सेवा केंद्रावर आमची करडीनजर असून , ज्या दुकानात बी- बियाणे व खताचा काळाबाजार होईल त्यावर कडक कारवाई करू, आणि खताचासाठा आल्याप्रमाणे आमच्या निघराणीखाली वाटप चालू आहे. आतापर्यंत प्रमाणित सोयाबीन बियाणे ९० टक्के वाटप झाले असून १००% अनुदानावर प्रत्येकी शेतकऱ्यांना एका हेक्टर प्रमाणे ७५ किलो सोयाबीन बियाणे देण्यात येते परंतु आपल्याकडे प्रमाणित शेतकरी २३ लक्षांक गट आहेत या अनुषंगाने ७०० क्विंटल सोयाबीन बियाणे उपलब्ध झाले असून यातील आतापर्यंत ४६५ क्विंटल बियाने २३ गटाला वाटप करण्यात आले आहे.

## विश्व बुजुर्ग दुर्व्यवहार जागरूकता दिवस साजरा

राजूर : (स. गांवकरी)

हवामान बदलाचा सामना करण्यास सक्षम वृद्धत्व: काळजी, प्रतिष्ठा आणि स्वावलंबन सुनिश्चित करणे' (Climate Resilient Ageing: Ensuring Care, Dignity & Agency) या विषयावरील राष्ट्रीय अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

१५ जून २०२६ रोजी, 'हेल्पएज इंडिया' (HelpAge India) तर्फे 'जागतिक वृद्ध छळ-प्रतिबंधक जागृती दिन २०२६' (World Elder Abuse Awareness Day) निमित्त श्रीमती मणीबेन एम. पी. शाह महिला महाविद्यालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या 'एव्ही रूम'मध्ये (AV Room) सकाळी १०:०० ते दुपारी १२:३० या वेळेत पार पडला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे "हवामान बदलाचा सामना करण्यास सक्षम वृद्धत्व: काळजी, प्रतिष्ठा आणि स्वावलंबन सुनिश्चित करणे" या शीर्षकाच्या



राष्ट्रीय अहवालाचे प्रकाशन. हा अहवाल उष्णतेची लाट (heat waves), पूर, दुष्काळ आणि पर्यावरणीय बदल यांसारख्या हवामान-संबंधित आपत्तींच्या परिणामांपासून वृद्ध व्यक्तींचे संरक्षण करण्याच्या गरजेवर भर देतो.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी सादर केलेल्या प्रार्थना गीताने झाली. राम नाईक (सह-संचालक, हेल्पएज इंडिया) यांनी मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन केले.

"हवामान बदलाचा सामना करण्यास सक्षम वृद्धत्व: काळजी, प्रतिष्ठा आणि स्वावलंबन सुनिश्चित करणे" या विषयावरील राष्ट्रीय अहवाल प्रकाशित करण्यात आला.

हेल्पएज इंडियाचे महाराष्ट्र आणि गोवा विभागाचे कार्यक्रम सह-संचालक व्हॅलेरियन पेस यांनी पीपीटी (PPT) सादरीकरण केले. त्यांनी अहवालात समाविष्ट असलेली राज्ये, जिल्हे आणि प्रतिसादकर्त्यांची संख्या तसेच 'आपत्ती जोखीम कमी करण्याच्या योजने'मध्ये (Disaster Risk Reduction plan) वृद्धांचा समावेश करण्याच्या गरजेवर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते 'सिल्व्हर इनिंग्ज' (Silver Innings) संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष शैलेश मिश्रा होते.

त्यांनी वृद्ध व्यक्तींचा आदर आणि त्यांना आधार देणारा 'वृद्ध-स्नेही समाज' (age-friendly society) निर्माण करण्याच्या महत्त्वावर भाष्य केले. तसेच, ज्येष्ठ नागरिकांची प्रतिष्ठा आणि स्वावलंबन सुनिश्चित करण्यात कुटुंबे, समुदाय आणि संस्थांच्या भूमिकेवरही त्यांनी प्रकाश टाकला.

डॉ. सायगीता चित्तुरू, डॉ. अर्चना पाटकी, डॉ. नागनाथ नरसिंहन प्रेम आणि डॉ. भालचंद्र पेढंबकर या तज्ज्ञांचा समावेश असलेली एक परिसंवाद चर्चा (panel discussion) आयोजित करण्यात आली होती. या चर्चेत हवामान बदल आणि वृद्धत्व, स्मृतिभ्रंश (dementia), वृद्धांच्या आरोग्याच्या समस्या, वृद्धांवरील छळ रोखणे आणि भावनिक व सामाजिक आधाराची गरज यांसारख्या विषयांचा समावेश होता.

## श्री रेडेश्वर महाराजांच्या पादुकांचे स्वागत

खोडद : (स. गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील बेल्हा येथे अधिकमास आणि एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर श्री रेडेश्वर महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री रेडेश्वर महाराजांच्या पादुका आणि मुखवट्याचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत श्री रेडेश्वर महाराजांच्या पादुका व मुखवटे यांचे मोठ्या भक्तीभावाने स्वागत करण्यात आले.

या निमित्ताने गावातून भव्य रथातून पादुकांची मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. गावातील रस्ते फुलांच्या रांगोळ्यांनी सजवले होते. ग्रामस्थांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करत आणि जयघोषात पादुकांचे स्वागत केले.

दर महिन्याला एकादशीला पादुकांचे पूजन करण्याची जुनी परंपरा मंदिरात आहे. यावर्षी अधिकमास असल्याने या सोहळ्याचे विशेष आयोजन करण्यात आले होते.त्यानंतर रथाची संपूर्ण गावातून ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली. मार्गावरील विविध ठिकाणी भाविकांनी दर्शन घेऊन श्रद्धापूर्वक पूजन केले. पुढे रथ मुक्ताबाई मंदिर येथे मुक्कामासाठी दाखल झाला, त्यानंतर ह .भ. प. विशाल हाडवळे यांचे प्रबोधनपर प्रवचन झाले. ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी आणि अधिकाधिक भाविकांचा सहभाग वाढावा या उद्देशाने दर तीन वर्षांनी अधिक मासात पादुकांची विशेष रथयात्रा आयोजित करण्यात येत असल्याची माहिती ट्रस्टच्या वतीने प्रसन्ना डोके यांनी दिली.

याप्रसंगी प्रवचन, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री उशिरापर्यंत हरिनामाचा जागर आणि पहाटे काकडा आरती करण्यात आली.

# अहिल्यानगर महानगरपालिकेत आय ए एस (IAS) दर्जाचा कार्यक्षम आयुक्तांची नेमणूक करावी

### वसंत लोढा यांचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

महानगरपालिका होऊन १५ वर्ष झाली.अहिल्यानगर शहराची आज बबजपूरी झाली असून अहिल्यानगर शहराची अत्यंत दुरावस्था झालेली दिसत आहे.शहरातील वाढती अतिक्रमणे, अस्वच्छता, वाढती वाहतूक कोंडी,अकार्यक्षम आरोग्यविभाग, विस्कळीत पाणीपुरवठा,शहराच्या भविष्याचा विचार न करता बांधकाम परवाने देणे,अवैध बांधकामाचा सुळसुळाट आणि भ्रष्ट कामाबद्दल न बोललेले बरे,अशा प्रकारे महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात अंदाधुंदी कारभार सुरू आहे. महानगरपालिकेचे अत्यंत बिकट अवस्था झालेली दिसत आहे.शहरातील अनेक समस्या सुटलेल्या दिसत नाहीत. अहिल्यानगर महानगरपालिकेला सध्या आयुक्त यशवंत डांगे असुन त्यांना जवळपास ३ वर्षे होतील. तरी देखील अहिल्यानगर शहराचा विकास झालेला दिसत नाही.तर ते भकास झाले आहे.हीच भावना नगरकरांच्या मनात आहे. मुंबई येथे मंत्रालयात भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांची समक्ष भेट घेऊन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी याबाबतचे पत्र दिले आहे. अहिल्यानगर शहराचा विकासाचा दृष्टिकोन ठेवून तसेच लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार दिलेले अधिकारी काय काम करू शकतात हे नगरकरांनी पाहिले आहे. कोणत्याही प्रकारे तडजोड व वशिलेबाजी न करता शहराच्या विकासासाठी कार्यक्षम आयएएस



दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी करावी.अशी मागणी वसंत लोढा यांनी केली आहे.

राज्य सरकार व केंद्र सरकारच्या माध्यमातून करोडो रुपये महानगर पालिकेला मिळाले तरी देखील शहराच्या विकासात भर पडल्याचे चित्र दिसत नाही.उदाहरणार्थ ३५० कोटी पेक्षा जास्त रक्कम पाणी योजेंनेसाठी खर्च झाली.तरी दिवसाआड शहराला पाणी येते. रस्त्याच्या बाबतीत ही तीच अवस्था आहे.शहराची वाढती वाहतूक कोंडी आणि अकार्यक्षम प्रशासन झालेले दिसते.महानगरपालिकेला पंधरा वर्ष झाले तरीदेखील शहराचा पाहिजे तेवढा विकास झालेला दिसत नाही. यापेक्षा नगरपालिका बरी होती असे नगरकरांना वाटत आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेसाठी कार्यक्षम अधिकारी,कडक शिस्तीचा,भ्रष्ट कारभाराला चलना न देणारे व जनतेचा विचार करणारा IAS दर्जाचा कार्यक्षम आयुक्तांची नेमणूक माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावी.अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी केली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट नको; पोलिसांची अ‍ॅडमिनना नोटीस



अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर शहरात दि. १७ जून २०२६ ते दि. २६ जून २०२६ या कालावधीत मोहरम उत्सव साजरा होणार आहे. या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व उत्सव शांततेच्या वातावरणात पार पडावा, यासाठी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम 168 अन्वये सोशल मीडिया व व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप अ‍ॅडमिनना नोटीस बजावली आहे.

पो.नि. देशमुख यांनी नोटीसमध्ये सोशल मीडिया ऑपरेटर व व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप अ‍ॅडमिन सदस्यांना खालील सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश दिले आहेत:

१. आक्षेपार्ह व वादग्रस्त पोस्ट नको: सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट तसेच वादग्रस्त मजकूर लिहून व्हॉट्सअ‍ॅप, इंस्टाग्राम व फेसबुक सारख्या सोशल मीडियावर प्रसारित करू नये.

२. तेढ निर्माण करणारी पोस्ट टाळा: सोशल मीडियावर दोन गटात, दोन समाजामध्ये, जाती धर्मात तेढ निर्माण होईल अशा पद्धतीने पोस्ट करू नये.

३. अफवांवर लक्ष ठेवा: आपले ग्रुपवर कोणतीही अफवा किंवा दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल अशा प्रकारचा मजकूर प्रसारित होणार नाही याची अ‍ॅडमिन म्हणून खबरदारी घ्यावी.

४. जातीय तेढीला प्रतिबंध: जातीय तेढ निर्माण होईल अशा प्रकारचे छायाचित्र अथवा मजकूर प्रसारित करू नये.

नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून मोहरम उत्सव काळात शांततेस व सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित अ‍ॅडमिनला जबाबदार धरण्यात येईल. त्यांच्याविरुद्ध प्रचलित कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल व सदरची नोटीस न्यायालयात पुरावा म्हणून सादर करण्यात येईल. सदरची नोटीस पो.नि. नितीन देशमुख यांनी दि. १७ जून २०२६ रोजी जारी केली आहे.

## अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरू




अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून सभासद संस्थांच्या (सेवा सोसायट्यांच्या) प्रतिनिधींचे ठराव १७ जून ते १६ जुलै या कालावधीत मागवण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक संभाजी निकम व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नगर मंगेश सुरवसे यांनी दिली. या निवडणुकीत मतदान करण्यासाठी ज्या सहकारी संस्था १ जून २०२३ किंवा त्यापूर्वी बँकेच्या सभासद असतील त्याच पात्र राहणार आहेत.प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था सोडून इतर सहकारी संस्था थकबाकीत असतील, तर अशा संस्था प्रतिनिधींना मतदानाचा अधिकार राहणार नाही. तथापि, प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था जर थकबाकीत असेल, तर अशा संस्थांच्या संचालकांच्याऐवजी सदर संस्थेच्या थकबाकीदार नसलेल्या एखाद्या सदस्याचा प्रतिनिधी म्हणून समावेश करण्यात करण्याचा ठराव घेता येईल. तसेच ज्या संस्थांच्या बाबतीत 73 क, अ (1), (ळ) फ अन्वये कार्यवाही केलेली असल्यास त्या संस्था मतदानासाठी पात्र राहणार नाहीत. बँक सभासद संस्थांचे प्रतिनिधींचे ठराव संस्थेचे मुख्यालय असलेल्या जिल्ह्यातील संबंधित उप / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. १७ जून ते १६ जुलै २०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सादर करावयाचे आहेत.

## सावेडीत शनिवारपासून तुलसी रामायण कथेस प्रारंभ

अहिल्यानगर (स. गांवकरी) : चिन्मय अमृत महोत्सवी वर्षा निमित्त अहिल्यानगर चिन्मय मिशन द्वारा आयोजित सुंदरकांड तुलसी रामायण कथेचा सावेडी येथील माऊली सभागृह येथे शनिवार दि. २० जून पासून प्रारंभ होत आहे. अशी माहिती नगर शाखेचे अध्यक्ष अ‍ॅड.धोंडीराम घोरपडे यांनी दिली. परमपूज्य स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांच्या पावन अमृत वाणीतून स्त्रवणाऱ्या कथा श्रवणाची संधी अहिल्यानगर मधील नागरिकांना होत असून शनिवार दि. २० जून ते गुरुवार दि. २५ जून पर्यंत ही कथा दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे. प्रवेश विनामूल्य आहे.तरी त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा.असे आवाहन सचिव देवराम मोरे यांनी केले आहे. या कथा सोहळ्यास चिन्मय मिशनचे स्वामी प्रत्ययानंद सरस्वती उपस्थित राहणार आहेत. तुलसी रामायण कथा,रामचरितमानस मधील सुंदरकांड हे श्रीराम - भक्त हनुमान यांचे माहात्म्य गुण,प्रभाव व लीला यांचे वर्णन सांगितले आहे.कलियुगाच्या सर्व दोषांचा परिहार सुंदर कांडाचे श्रवण - पठणाने होतो. हनुमंताची भक्ती म्हणजे रामकृपेची प्राप्ती होते,असा या सुंदरकांडाचा सार आहे. तरी त्याचा लाभ अहिल्यानगर मधील नागरिकांनी घ्यावा.असे स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी सांगितले.

## प्रगत विद्यालयाच्या लिपिकाविरुद्ध कोतवाली पोलिसांत गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर येथील गांधी मैदान परिसरातील प्रगत विद्यालयात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बारावी बोर्डाच्या परीक्षेची फी भरण्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांची आर्थिक आणि शैक्षणिक फसवणूक केल्याप्रकारणी विद्यालयाचा लिपिक लुहाण लक्ष्मण पहिलाजरॉय याच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सर्जेपुरा येथील किराणा व्यावसायिक अमोल टिल्लु गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी लिपिकाने फिर्यादीचा मुलगा आणि इतर चार विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करून, त्यांच्याकडून बारावी बोर्ड एटीकेटी परीक्षेचे शुल्क रोख स्वरूपात गोळा केले होते. मात्र, सदर रक्कम ऑनलाइन पद्धतीने बोर्डाकडे जमा न करता, एकूण ३ हजार १५० रुपयांचा अपहार केला. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असून त्यांची फसवणूक झाली आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर गायकवाड यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी लुहाण पहिलाजरॉय विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## राजमाता कन्या विद्यालयात नवीन विद्यार्थिनींचा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींचा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात पार पडला. विद्यालयात विद्यार्थिनींचे आगमन होताच त्यांचे गुलाबपुष्प व पेन देऊन स्वागत करण्यात आले. ढोल-ताशा आणि झांज पथकाच्या गजरात नवीन विद्यार्थिनींचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. विद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून आकर्षक सजावट करण्यात आली होती. तसेच विद्यार्थिनींना शाळेची ओळख करून देणारा विशेष सेल्फी पॉइंटही उभारण्यात आला होता.

# अहिल्यानगरच्या देवदत्त गुंडू यांची पाच सुवर्ण पदकांवर मोहोर

### बँकॉक येथे भारतीय पॉवरलिफ्टिंग खेळाडूंची सुवर्णमय कामगिरी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

थायलंडमधील बँकॉक येथे १३ व १४ जून २०२६ रोजी पार पडलेल्या डब्ल्यूआरपीएफ आयर्न वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२६ या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी करत देशाचा तिरंगा अभिमानाने फडकावला. या स्पर्धेत ११५ किलो वजन गटातील सिनियर विभागात सहभागी झालेल्या देवदत्त प्रवीण गुंडू यांनी अप्रतिम ताकद, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तब्बल पाच सुवर्णपदके पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले.

देवदत्त गुंडू यांनी स्पर्धेतील संपूर्ण पॉवरलिफ्टिंग प्रकार- एसीबीडी , पुश पूल ,ओन्ली देड़ीफ्ट ,बेंच प्रेस,ओन्ली सुक्ट्स (SBD , push pull ,only Deadlift ,only bench press ,only squats ) अशा पाचही प्रकारांमध्ये प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवत सुवर्णपदकांची कमाई केली. जागतिक स्तरावरील या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत मिळविलेले हे यश भारतीय शक्तीउचल क्षेत्रासाठी अत्यंत गौरवास्पद मानले जात आहे.

देवदत्त गुंडू हे अनेक वर्षांपासून पॉवरलिफ्टिंग खेळामध्ये सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. यापूर्वी रशिया येथे झालेल्या डब्ल्यूआरपीएफ जागतिक पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत त्यांनी रौप्यपदक पटकावून भारताला मान मिळवून दिला होता. तसेच व्हिएतनाम येथे झालेल्या डब्ल्यूआरपीएफ आशियाई पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत एक सुवर्ण आणि एक कांस्यपदक जिंकून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली होती. राष्ट्रीय स्तरावरील विविध अजिंक्यपद स्पर्धांमध्येही त्यांनी अनेक सुवर्णपदके, चषक आणि मानचिन्हे प्राप्त केली आहेत.

देवदत्त गुंडू यांच्या यशामागे कठोर परिश्रम, शिस्तबद्ध सराव आणि खेळाप्रती असलेली निष्ठा हे महत्त्वाचे घटक आहेत. त्यांनी स्वतः उत्कृष्ट खेळाडू म्हणून नाव कमावतानाच अनेक खेळाडूंना प्रशिक्षण देऊन त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविण्याचे कार्यही केले आहे.

त्यांचे शिष्य किशोर यशवंत शिंदे यांनीदेखील या स्पर्धेत शानदार कामगिरी करत ९० किलो वजन गटातील मास्टर-१ विभागात सुवर्णपदक पटकावले. जागतिक स्पर्धेतील हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण




सरावाचे आणि प्रशिक्षक देवदत्त गुंडू यांच्या प्रभावी मार्गदर्शनाचे फलित मानले जात आहे. किशोर शिंदे यांनी यापूर्वी रशिया येथे झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. तसेच दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतही त्यांनी सुवर्णपदक प्राप्त करून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या दोन्ही खेळाडूंच्या यशामुळे भारतीय पॉवरलिफ्टिंग क्षेत्राला नवी प्रेरणा मिळाली असून, महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचा झेंडा अभिमानाने फडकविणाऱ्या या खेळाडूंनी युवा पिढीसमोर आदर्श निर्माण केला आहे.


या यशाबद्दल देवदत्त गुंडू यांनी डब्लूआ पीएफ चे अध्यक्ष सुनील लोंचब, राज्य अध्यक्ष सौरभ चौधरी, शीतल चौधरी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. त्यांच्या मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सहकार्यामुळे भारतीय खेळाडूंना जागतिक स्तरावर आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

जागतिक स्पर्धेत मिळविलेल्या या ऐतिहासिक यशामुळे देवदत्त गुंडू आणि किशोर शिंदे यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, त्यांच्या या सुवर्णमय कामगिरीने भारतीय पॉवरलिफ्टिंग क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्यांच्या यशामुळे अनेक युवकांना खेळाकडे आकर्षित होण्याची प्रेरणा मिळणार असून भविष्यातही ते देशासाठी अशीच गौरवशाली कामगिरी करतील, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

## प्रगत विद्यालयाच्या लिपिकाविरुद्ध कोतवाली पोलिसांत गुन्हा दाखल

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नगर येथील गांधी मैदान परिसरातील प्रगत विद्यालयात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बारावी बोर्डाच्या परीक्षेची फी भरण्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांची आर्थिक आणि शैक्षणिक फसवणूक केल्याप्रकारणी विद्यालयाचा लिपिक लुहाण लक्ष्मण पहिलाजरॉय याच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सर्जेपुरा येथील किराणा व्यावसायिक अमोल टिल्लु गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी लिपिकाने फिर्यादीचा मुलगा आणि इतर चार विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करून, त्यांच्याकडून बारावी बोर्ड एटीकेटी परीक्षेचे शुल्क रोख स्वरूपात गोळा केले होते. मात्र, सदर रक्कम ऑनलाइन पद्धतीने बोर्डाकडे जमा न करता, एकूण ३ हजार १५० रुपयांचा अपहार केला. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले



असून त्यांची फसवणूक झाली आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर गायकवाड यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी लुहाण पहिलाजरॉय विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## ढोल-ताशांच्या गजरात डोके विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

### विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून शिक्षणाचा लाभ घ्यावा – आशादेवी डोके

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी डोके विद्यामंदिर व साई विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात, पुष्पगुच्छ देऊन आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेचा परिसर फुलांच्या सजावटीने नटला होता.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांचा उत्साह आणि शिक्षकांची आत्मीयता यामुळे संपूर्ण परिसर आनंदमय झाला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा आशादेवी डोके या होत्या. प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना पुष्पगुच्छ प्रदान करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. ढोल-ताशांच्या निनादात विद्यार्थ्यांचे शाळेत आगमन होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले.अध्यक्षीय भाषणात आशादेवी डोके म्हणाल्या, "विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे पवित्र कार्य शाळा करीत असते.



प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित शाळेत उपस्थित राहून मन लावून अभ्यास करावा. शिस्त, परिश्रम आणि सातत्य यांच्या बळावरच यश मिळते. शाळेतील विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधावा." त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे यांनी शाळेतील विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकांनी शाळेवर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. साई विद्यालयाचे मुख्याध्यापक संभाजी पवार यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, "यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो. दररोजचा नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थी कोणतेही ध्येय साध्य करू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये अपार क्षमता असून ती ओळखून तिचा विकास करणे आवश्यक आहे." यावेळी पालक प्रतिनिधी श्रीकांत सर्जेराव आंधळे यांनी विद्यार्थ्यांना बिस्कीट पुड्यांचे वाटप करून त्यांचे स्वागत केले. त्यांच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये यामुळे विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया वाळके यांनी प्रभावीपणे केले. अध्यक्षीय सूचना आशा धामणे यांनी दिल्या, तर आभार प्रदर्शन राणी राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंजू नवगिरे, संजोग बर्वे, अभिषेक खामकर आणि सुजाता कर्डीले यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन ज्योती पवार यांनी केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा स्वागत समारंभ संस्मरणीय ठरला. नवागत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात सकारात्मक वातावरणात झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## ऊस बेणे तोडताना वरचा भाग छोटा व खालचा भाग मोठा असावा : अध्यक्ष सुभाष मोरे

शिवनेरी : (स. गांवकरी)

ऊस बेणे तोडताना वरचा भाग छोटा व खालचा भाग मोठा असावा . यामुळे काही तोटा होणार नाही पण उसाच्या वजनात वाढ निश्चित होणार आहे असे श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना जुन्नर / आंबेगाव आयोजित शिरोली खुर्द येथील श्रीराम मंदिरात ऊस विकास मेळावा प्रसंगी अध्यक्ष शुकरकेन डेव्हलपमेंट ग्रुप सुभाष मोरे यांनी सभासदांना मार्गदर्शन केले. ऊस लागवड करण्याअगोदर शेणखत टाकणे किंवा ताग टाकणे फायदेशीर आहे . ऊस बेणे तोडल्यानंतर रासायनिक बीज प्रक्रिया करणे गरजेचे आहे . शिरोली खुर्द, शिरोली बुद्रुक, कुमशेत , हिवरे , ओझर व इतर ठिकाणी आडसाली ऊस लागवड जास्त प्रमाणात आहे .

उसाची सरी अडीच फूट किंवा सव्वा दोन फूट काढून एक सरी लागवड करून दुसरी सरी रिकामी सोडणे महत्त्वाचे आहे . बहुतांश शेतकरी साडेचार किंवा पाचफुट ऊस सरी ची लागवड करत आहे . ऊस सात ते आठ महिन्याचा झाल्यानंतर पाचट साळणे महत्त्वाचे असून यामुळे सूर्यप्रकाश उसाच्या खोडा पर्यंत जाऊन उसाचे वजन वाढत आहे असे अध्यक्ष मोरे यांनी सभासदांना सांगितले .

पाऊस जास्त झाला का मुलीला जास्त हालचाल करता येत नाही पण पाऊस लांबला का उणीचा प्रादुर्भाव जास्त असतो याबाबत काळजी घेणे गरजेचे आहे . ऊस फवारणी करताना पंप जास्त वेळा हलवणे गरजेचे आहे यामुळे औषध प्रमाण सारखे प्रमाणात होते . असे ऊस विकास अधिकारी संदीप मोरडे यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले . याप्रसंगी उपाध्यक्ष संतोष सोमवंशी , शिरोली बुद्रुक कृषक सेवा सोसायटी संचालक संतोष डोके , माजी सरपंच धोंडीभाऊ मोरे , वंचित थोरवे , ऊस उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते .

## क्रिझॅकची फॉरेनअ‍ॅडमिट्समध्ये धोरणात्मक गुंतवणूक

पुणे : (स. गांवकरी)

आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या अग्रगण्य तंत्रज्ञानाधारित व्यासपीठांपैकी एक असलेल्या क्रिझॅक लिमिटेडने फॉरेनअ‍ॅडमिट्स या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विद्यार्थी सेवा व्यासपीठामध्ये धोरणात्मक गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. या व्यवहारानंतर फॉरेनअ‍ॅडमिट्सचे संस्थापक निखिल जैन हे क्रिझॅकमध्ये मुख्य उत्पादन आणि विपणन अधिकारी म्हणून रुजू होणार आहेत. फॉरेनअ‍ॅडमिट्सने आतापर्यंत एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना सेवा दिली असून सुमारे १,५०० कोटी रुपयांहून अधिक शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देण्यात मदत केली आहे. या गुंतवणुकीमुळे क्रिझॅकला विद्यार्थ्यांच्या परदेशातील शिक्षण प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यांवर अधिक प्रभावी सेवा देता येणार आहे.

Crizac
MAKING EDUCATION EASY

- विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सर्वसमावेशक सेवा उपलब्ध होणार

विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी देश व संस्था निवडणे, शैक्षणिक कर्ज मिळवणे, आर्थिक नियोजन करणे तसेच व्हिसा प्रक्रिया पूर्ण करणे यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुविधा उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा मानस आहे. फॉरेनअ‍ॅडमिट्स ही संस्था मात्र स्वतंत्र ब्रँड म्हणूनच कार्यरत राहणार आहे. क्रिझॅककडे सध्या युनायटेड किंग्डम, कॅनडा, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील ४०० हून अधिक शैक्षणिक संस्थांशी भागीदारी आहे.

# श्री नाथ विद्या मंदिरात “प्रवेशोत्सव” उत्साहात संपन्न

### नवीन विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत; शिक्षणासोबत संस्कारांची जोपासना करण्याचा निर्धार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री नाथ विद्या मंदिर व डॉ.पाऊलबुधे माध्यमिक शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त आयोजित करण्यात आलेला “प्रवेशोत्सव” मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात संपन्न झाला.

शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, टाळ्यांचा कडकडाट व मंगलमय स्वागतगीतांच्या माध्यमातून स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि पालकांचा उत्साह लक्षवेधी ठरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी



दीपप्रज्वलन करून सरस्वती पूजन करण्यात आले. यानंतर शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत शिक्षणाच्या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. प्रवेशोत्सवानिमित्त संपूर्ण शाळा आकर्षक फुलांची सजावट, रंगीबेरंगी फलक व स्वागत कमानींनी सजविण्यात आली होती.

विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक उपक्रम, खेळ, सांस्कृतिक सादरीकरणे तसेच प्रेरणादायी मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सहसरचिटणीस रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना संबोधित करताना श्री.बुचकुल यांनी सांगितले की,“शिक्षण हे केवळ गुण मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यामुळे शिस्त, संस्कार, प्रामाणिकपणा आणि परिश्रम या मूल्यांची जोपासना करत ज्ञानार्जन करणे आवश्यक आहे. श्री.देशमुख म्हणाले की शाळेतील प्रत्येक दिवस हा नवीन शिकण्याची संधी म्हणून स्वीकारल्यास यश नक्की मिळते.”

श्री.भोईटे यांनी सांगितले की, “श्री नाथ विद्या मंदिर हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य सातत्याने करत आहे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती जोपासून आत्मविश्वासाने शिक्षण घ्यावे व पालकांनीही मुलांच्या प्रगतीसाठी शाळेला सहकार्य करावे.”असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माध्यमिकच्या प्राचार्य विजया नवले, श्री नाथ मंदिर च्या मुख्याध्यापिका संगीता सब्बन यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत घर आणि शाळा यांच्यातील सुसंवादामुळे विद्यार्थ्यांचा विकास अधिक प्रभावीपणे होतो.असे मत व्यक्त करण्यात आले. उपस्थित पालकांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले.

प्रवेशोत्सवामुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. नवीन विद्यार्थ्यांनीही शाळेच्या वातावरणाशी सहजपणे जुळवून घेत शिक्षणाच्या नव्या पर्वाला उत्साहाने सुरुवात केली.

# अवैध सागवान तस्करीवर वनविभागाची धडक कारवाई; दोघे जेरबंद, दोघे फरार



**किनवट : (स. गांवकरी)**

पाटोदा नियतक्षेत्रातील राखीव वन क्षेत्रातून अवैधरित्या सागवान लाकडाची वाहतूक करणाऱ्या टोळीवर वनविभागाने धडक कारवाई करत दोन आरोपींना रंगेहात पकडले. या कारवाईत ६० हजार ४०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयाने १८ जून २०२६ पर्यंत वन कोठडी सुनावली आहे. दरम्यान, दोन आरोपी अंधार व रस्त्यावरील वाहनांच्या वर्दळीचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार होण्यात यशस्वी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ जून २०२६ रोजी पाटोदा वनक्षेत्रातून अवैध सागवान लाकडाची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती वनविभागाला प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे वनअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने पाटोदा येथील राखीव वन रस्त्यावर सापळा रचला. दरम्यान, विना नंबरची एक ऑटोरिक्षा सागवान लाकूड घेऊन चिखली बु. गावाच्या दिशेने जात असल्याचे निदर्शनास आले.

वनविभागाच्या पथकाने तत्काळ पाठलाग करून संबंधित वाहन अडविले. तपासणीदरम्यान ऑटोरिक्षामध्ये ०.४९२ घनमीटर परिमाणाचे आठ नग सागवान गोल लाकूड आढळून आले. जप्त करण्यात आलेल्या लाकडाची किंमत १० हजार ४०५ रुपये असून वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या ऑटोरिक्षाची किंमत ५० हजार रुपये असल्याचे वनविभागाने नमूद केले आहे. अशा प्रकारे एकूण ६० हजार ४०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत जुबेर खैरोद्दीन शेख (रा. चिखली बु.) व मारुती गुरुनाथ केसाळे (रा. चिखली बु.) यांना वनविभागाने ताब्यात घेतले. मात्र, शेख मज्जु शेख इद्रीस व शेख जाकीर शेख अहमद हे दोघे आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी वनविभागाकडून विशेष प्रयत्न सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

या प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत वनगुन्हा क्र. ०३/२०२६ नोंदविण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींना प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालय, किनवट येथे हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना १८ जून २०२६ पर्यंत वन कोठडी सुनावली.



तामसा : तामसा येथील प्रतिष्ठित व्यापारी गंगाप्रसाद नामेवाड यांचा हिमायतनगर–सरसम मार्गावरील सरसम पाटीजवळ झालेल्या भीषण रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे तामसा परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून सर्व स्तरातून नामेवाड कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांनी नामेवाड यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

## थोडक्यात बातम्या...



### पंचशील मित्र मंडळाचा स्तुत्य उपक्रम; विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील एरंडोली येथे पंचशील मित्र मंडळाच्या वतीने इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शालेय साहित्य वाटपासाठी मच्छिंद्र पाडळे, राजेंद्र शिंदे, जालिंदर पाटोळे, गौतम शिंदे, तनुजा पाडळे, संगीता सोनवणे, पप्पू शिंदे आणि उत्तम शिंदे यांनी विशेष योगदान दिले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रा. राजेंद्र शेंडगे आणि संगीता कांबळे यांनी शालेय जीवनातील शिस्त, नियमित अभ्यास तसेच उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक प्रेरणा निर्माण झाली. साहित्य वाटपानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे भाव पाहायला मिळाले. कार्यक्रमास प्रा. राजेंद्र शेंडगे, विकास शिंदे, राजेंद्र शिंदे, गणेश शिंदे, विजय शिंदे, रेखा शिंदे, संगीता कांबळे, मीना शिंदे, गणेश कोळपे, अतुल शेंडगे, सोनू शिंदे, भाऊसो कोळपे, मुकेश कांबळे तसेच माता रमाई व माता भीमाई महिला बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पप्पू शिंदे यांनी केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रोत्साहन देणारा ठरला असून पंचशील मित्र मंडळाच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवणारा ठरला.



### अरणगाव दु. येथील जिल्हा परिषद शाळेत पाठ्यपुस्तक व गणवेश वाटप

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील अरणगाव दु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांची बैलगाडीतून गावातून मिरवणूक काढत त्यांना शाळेत प्रवेश देण्यात आला. या उपक्रमामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मोहनराव आढाव होते. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच सरपंच मोहनराव आढाव यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. सातववाडी, लभडे वस्ती तसेच मिरावली माध्यमिक विद्यालय येथेही नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

### आमदार भीमराव केराम यांचे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना निवेदन



किनवट (स. गांवकरी) : नंदिग्राम एक्सप्रेस (11001/11002) या महत्त्वपूर्ण रेल्वेगाडीतील डब्बा संरचनेत करण्यात आलेल्या बदलामुळे निर्माण झालेल्या प्रवासी समस्यांची दखल घेत किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करून गाडीतील डब्यांची संख्या वाढविण्याची आणि पूर्वीप्रमाणे स्लीपर श्रेणीतील डब्बे उपलब्ध करून देण्याची जोरदार मागणी केली आहे. हे निवेदन दिनांक १६ जून २०२६ रोजी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे सादर करण्यात आले. निवेदनात आमदार केराम यांनी नमूद केले आहे की, नंदिग्राम एक्सप्रेस ही केवळ एक रेल्वेगाडी नसून मराठवाडा, विदर्भ आणि तेलंगणा या तीन महत्त्वाच्या प्रदेशांना जोडणारी जीवनवाहिनी आहे.

### राज ठाकरे यांच्या ५८ व्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

बिलोली (स. गांवकरी) : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या ५८ वा वाढदिवस व जागतिक रक्तदाता दिननिमित्त ( दि.१४ )जून रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, त्यात रक्तदान शिबिर, अन्नपूर्णामाता रत्नेश्वरी, श्रामनेर भिखू प्रशिक्षण केंद्र खुरगाव येथे वृक्षारोपण आणि स्विस बेकरीच्या बाजूस महिलांचे आरोग्य तपासणीसह विविध उपक्रम राबविण्यात आले. रक्तदान शिबिरात २०० रक्तदात्याचे रक्तदान करण्याचे संकल्प करण्यात आले होते आणी या रक्तदान शिबिरात एकूण ९८ रक्तदात्यांनी रक्तदान केले, आरोग्य तपासणीत जवळपास १०० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली व रत्नेश्वरी आणी खुरगाव येथे ५० फळाच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. या शिबिरास मनसे जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंग जहागीरदार यांचे मार्गदर्शन लाभले.

# धास्तीने किनवट-गोकुंद्यात हॉटेल्स बंद; जनजागृतीची गरज अधोरेखित



**किनवट : (स. गांवकरी)**

राज्यात अन्न सुरक्षा व भेसळ प्रतिबंधक कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अन्न व औषध प्रशासनाने आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू केलेल्या कारवायांमुळे अनेक ठिकाणी व्यापारी व खाद्य व्यावसायिकांमध्ये जागरूकता वाढली असली, तरी काही ठिकाणी भीतीचे वातावरणही निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. १७) किनवट शहर व गोकुंदा परिसरातील अनेक हॉटेल्स, भोजनालये व खानावळी दिवसभर बंद असल्याचे चित्र पाहायला मिळाले. परिणामी कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामीण भागातून विविध कामांसाठी आलेले नागरिक तसेच प्रवासी यांना जेवणाची मोठी गैरसोय सहन करावी लागली. अन्न सुरक्षा व मानके कायदा तसेच भेसळ प्रतिबंधक नियमांचे पालन करणे हे प्रत्येक खाद्य व्यावसायिकाचे कर्तव्य आहे. मात्र या कायद्यांबाबत पुरेशी माहिती नसल्याने काही व्यापाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होत असून तपासणी पथक येत असल्याची माहिती मिळताच आस्थापना बंद करून काहीजण पळवाट काढण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तज्ज्ञांच्या मते, कारवाईची भीती बाळगण्यापेक्षा आवश्यक नियमांचे काटेकोर पालन करणे हा अधिक योग्य मार्ग आहे. खाद्य व्यवसायांमध्ये वापरण्यात येणाऱ्या सर्व खाद्यपदार्थांवर उत्पादन दिनांक, कालबाह्यता (एक्सपायरी) दिनांक, साठवणुकीची योग्य व्यवस्था, स्वच्छता, परवाने व नोंदणी यांचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच अवैध गुटखा, सुगंधित तंबाखू, भेसळयुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थ, पनीर, पेढे, शीतपेये आणि इतर खाद्यपदार्थांची नियमित तपासणी व नमुना चाचणी केली जात असल्याने संबंधित व्यावसायिकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. बाहेरून येणाऱ्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेची खात्री करणेही तितकेच महत्त्वाचे मानले जात आहे. दरम्यान, केवळ कारवाईच्या भीतीपोटी आस्थापना बंद ठेवून प्रश्न सुटणार नाही, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. व्यापाऱ्यांना अन्न सुरक्षा कायदे, परवाना प्रक्रिया, तपासणीचे निकष आणि आवश्यक नियम याबाबत सविस्तर मार्गदर्शन व जनजागृती करण्याची गरजही व्यक्त केली जात आहे. यासोबतच, कोणत्याही व्यक्तीने अथवा मध्यस्थाने अधिकाऱ्यांचे नाव सांगून व्यापाऱ्यांची फसवणूक किंवा आर्थिक लुबाडणूक करू नये, यासाठी प्रशासनानेही दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, व्यापाऱ्यांचे प्रबोधन आणि ग्राहकांच्या आरोग्याचे संरक्षण या तिन्ही बाबींचा समतोल राखणे ही काळाची गरज असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे.



# कोलंबी उपसा सिंचन प्रकल्प पूर्णत्वास

**नायगाव : (स. गांवकरी)**

नायगाव तालुक्याच्या कृषी विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा कोलंबी उपसा सिंचन प्रकल्प अखेर पूर्णत्वास आला असून, बळेगाव-घुगराळा डी.सी. चेंबरपर्यंत पाणी पोहोचल्याने प्रकल्पाच्या यशस्वीतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हा प्रकल्प साकार झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, आर्थिक समृद्धीच्या नव्या पर्वाची सुरुवात होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीवरील विष्णुपुरी प्रकल्पाशी संलग्न असलेल्या या योजनेद्वारे बळेगाव येथून जलवाहिनीद्वारे पाणी नायगाव परिसरातील शेतीपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. यासाठी सुमारे ३० किलोमीटर लांबीची जलवाहिनी उभारण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे नायगाव तालुक्यातील जवळपास १० हजार एकर क्षेत्र ओलिताखाली येणार असून सुमारे ३४ ते ३५ गावांतील शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ होणार आहे.

# खासदारांविरोधात घरासमोर आंदोलनाचा काँग्रेसचा इशारा

**पुणे: (स. गांवकरी)**

इंडिया आघाडीच्या तिकिटावर निवडून आलेले खासदार सत्ताधारी पक्षात प्रवेश करत असतील, तर तो मतदारांच्या जनादेशाशी विश्वासघात असल्याचा आरोप करत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी अशा खासदारांच्या घरांसमोर तीव्र निषेध आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात तिवारी यांनी म्हटले आहे की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत जनतेने संविधानाचे संरक्षण, लोकशाही मूल्यांचे जतन आणि केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात स्पष्ट जनादेश दिला होता. या पार्श्वभूमीवर विरोधी आघाडीच्या पाठिंब्यावर निवडून आलेले खासदार पक्षांतर करत असतील, तर ते मतदारांचा विश्वासघात करणारे कृत्य ठरेल. तिवारी यांनी दावा केला की, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या खासदारसंख्येत लक्षणीय वाढ झाली असून देशातील जनतेने सशक्त विरोधी पक्षाला पाठिंबा दिला आहे. दुसरीकडे, भाजपला अपेक्षित यश मिळाले नसून



केंद्रातील सरकार हे मित्रपक्षांच्या पाठिंब्यावर सत्तेत असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील संभाव्य पक्षांतराच्या चर्चांवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, इंडिया आघाडीतील उमेदवारांना निवडून आणण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेतले आहेत. त्यामुळे जनतेच्या कौलाच्या विरोधात जाऊन पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींविरोधात काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरतील. पक्षांतर करणाऱ्या खासदारांच्या घरांसमोर निषेध आंदोलने करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा देत तिवारी यांनी लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी संघर्ष सुरूच राहील, असेही सांगितले.

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण जातीय जनगणनेनंतरच करावे

उपमहापौर परशुराम वाडेकर : रामदास आठवले यांच्या भूमिकेचा विपर्यास करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न निंदनीय

**पुणे : (स. गांवकरी)**

अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करणे हे समाजात अंतर्गत फूट निर्माण करणारे ठरू शकते. त्यामुळे पक्षाचा त्याला प्राथमिक विरोध आहे. मात्र, उपवर्गीकरण करायचेच असल्यास ते लोकसंख्येच्या अचूक प्रमाणावर आधारित असावे आणि राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुण्याचे उपमहापौर तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे नेते परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत केली.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनानुसार ही भूमिका मांडण्यात आली. यावेळी पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, नगरसेवक निलेश अल्हाट, महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले, बसवराज गायकवाड, गोविंद साठे आदी उपस्थित होते.

वाडेकर म्हणाले की, अनुसूचित जातींतील विविध घटक सामाजिक हक्कांसाठी अनेक वर्षांपासून एकत्रितपणे संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत घाईघाईने घेतलेल्या निर्णयामुळे समाजातील ऐक्याला तडा जाण्याची शक्यता आहे. जनगणनेतून प्रत्येक जातीची अचूक लोकसंख्या समोर आल्यानंतरच कोणतेही धोरणात्मक निर्णय घेतल्यास सर्व घटकांना न्याय मिळू शकेल. राज्यातील उर्वरित ५८ अनुसूचित समाजघटकांनाही शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात समान संधी मिळाव्यात, अशी पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




**पत्रकार परिषदेत मांडण्यात आलेले मुख्य मुद्दे**

- अंतर्गत फुटीला विरोध: उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत गटबाजी आणि फूट पडू शकते, त्यामुळे याला प्राथमिक स्तरावर पक्षाचा विरोध आहे.
- लोकसंख्येनुसार वाटप: जर काही कारणांमुळे उपवर्गीकरण करणे अपरिहार्य ठरले, तर ते सरसकट न करता लोकसंख्येच्या अचूक आकडेवारीनुसार केले जावे.
- जातीय जनगणनेची प्रतीक्षा: देशात सध्या राष्ट्रीय स्तरावर जातीय जनगणनेचे काम सुरू आहे. या जनगणनेच्या अहवालातून प्रत्येक जातीची खरी आणि अद्ययावत लोकसंख्या समोर येईल.
- घाईघाईने निर्णय नको: जनगणनेचे अधिकृत आकडे येण्यापूर्वी कोणताही निर्णय घेतल्यास काही वंचित समाजघटकांवर मोठा अन्याय होऊ शकतो. त्यामुळे जनगणनेनंतरच ही प्रक्रिया राबवावी.

तसेच २०२७ च्या जनगणनेनंतर लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाचा पुनर्विचार करण्याची मागणीही त्यांनी केली.

शहराध्यक्ष संजय सोनवणे यांनी काही व्यक्तींनी रामदास आठवले यांच्या वक्तव्याचा संदर्भविरहित विपर्यास करून समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याचा आरोप केला. त्यामुळे अनुसूचित समाजघटकांमध्ये अविश्वास आणि संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका त्यांनी केली. जबाबदार लोकप्रतिनिधींनी तथ्यांचा विपर्यास करून समाजाची दिशाभूल करणे खेदजनक असल्याचेही ते म्हणाले.

प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी सांगितले की, अनुसूचित जातींमध्ये एकूण ५९ जाती असून उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर दोन समाजांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होत आहे.

# व्यंकनाथ विद्यालयात विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप**

**श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. यावेळी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे आगमन होताच शिक्षकांनी त्यांचे स्वागत करून नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास नागवडे कारखान्याचे माजी संचालक विलासराव काकडे, स्कूल कमिटी सदस्य पुरुषोत्तम बापू लगड, संदीप डांगे, माजी प्राचार्य बाळासाहेब शेंडे, पत्रकार संतोष गोरखे, प्राचार्य बाळासाहेब जठार तसेच सेवकवृंद उपस्थित होते.




नागवडे कारखान्याचे संचालक व स्कूल कमिटीचे अध्यक्ष डी. आर. काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शालेय व्यवस्थापन समिती व पालकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डी. आर. काकडे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करून शाळेची शिस्त जपावी, शिक्षकांनी दिलेले ज्ञान आत्मसात करावे आणि नियमित उपस्थिती राखावी, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या अडचणी मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणून त्यांचे निराकरण करून घ्यावे, असेही त्यांनी सांगितले. विद्यालयात अनुभवी शिक्षकवर्ग व उत्तम शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांनी गुणवत्तावृद्धीसाठी प्रयत्नशील राहावे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

माजी प्राचार्य बाळासाहेब शेंडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना शिस्त, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कर्तृत्वाच्या बळावर विद्यालयाचा नावलौकिक वाढविण्याचे आवाहन केले. शिक्षण हे उज्ज्वल भविष्याचे प्रमुख साधन असून विद्यार्थ्यांनी मेहनतीच्या जोरावर स्वतःसह पालक व विद्यालयाचे नाव उंचावावे, असे ते म्हणाले. प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी प्रास्ताविकात विद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी वेळेचे पालन करून शिक्षकांकडून मिळणाऱ्या ज्ञानाचा पुरेपूर लाभ घ्यावा, शिक्षणामुळे सर्वांगीण विकास साधला जातो आणि शिस्तीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक ज्ञानदेव धायगुडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपशिक्षिका नौशाद शेख यांनी केले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी झालेल्या या स्वागत समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)